# २९ भेट (Appointment)

एका खाजगी कंपनीत अरूण उच्च पदावर काम करत असतो. भरपूर शिक्षण, रूबाबदार, कामाचा प्रचंड उरक. यथावकाश त्याचे लग्न होते. बायकोचा पायगुण पण कामी येतो. बढती मिळते. २ वर्षात अरूण बाप होतो. आयुष्यावर खूप खुष असतो. आयुष्यात जे जे मिळावे असे वाटले ते मिळालेले असते. शिक्षण, पैसा, संपत्ति, चांगली बायको व मुलगा.

कालांतराने अरूण त्या कंपनीचा मुख्य अधिकारी होतो. घरातला वेळ कमी होत जातो. १५ – १६ तास कामानिमित्त घराबाहेर राहावे लागते. मुलगा ५ वर्षाचा होतो. जात्याच हुशार. वडिलांचा सहवास मिळतच नाही. पण जाता येता नवीन खेळणी, कपडे, पुस्तके, गेम्स मिळत असतात. बाबांना वेळ नसतो. तो इवलासा जीव दुःखी होत असे. अशीच काही वर्षे जातात. तो मुलगा ५ व्या इयत्तेत शिकत असतो.

एकदा अरूणला थोडे बरे नसते म्हणून तो लवकर घरी येतो. त्या मुलाला आश्र्चर्य वाटते की आज आपले बाबा लवकर कसे घरी आले ? तो बाबांच्या कपाळाला पेन बाम चोळून देतो. बाबा लाडात येऊन मुलाशी प्रेमाने गप्पा मारू लागतात. तो मुलगा सहज विचारतो की बाबा तुम्हाला दिवसाला किती पैसे मिळतात ? बाबाना चटकन कळत नाही. तो मुलगा बाबाना परत तो प्रश्न विचारतो. बाबाना राग येतो. ते म्हणतात कि तुला काय करायचेत चौकशा ? मुलगा हिरमुसला होतो.

बाबा त्याला सांगतात कि मला दिवसाला एवढे पैसे मिळतात. तो मुलगा चटकन हिशेब करतो व सांगतो म्हणजे तुम्हाला प्रत्येक तासाला ५०००/- रूपये मिळतात. मला १०००/- रूपये उधार द्याल ? येणा–या वाढदिवसाला काही देऊ नका. बाबाना काहीच अर्थबोध होत नाही. मुलगा समजावतो कि आजपर्यंत मला मिळालेल्या पॉकेटमनी मधून मी ४००० रू. साठवले आहेत. बाबा त्याला पाकीटातून १००० रूपये देतात. मुलगा आपल्या कपाटातून ४००० रूपये आणतो व बाबानी दिलेले १०००/- घेऊन तो सर्व ५००० रूपये बाबांच्या हातात देतो व सांगतो की बाबा तुमची १ तासाची मिळकत तुम्हाला देत आहे. उद्या माझ्यासाठी १ तास वेळ काढाल. बाबाला हे ऐकून रडूच कोसळते. ते सर्व पैसे अरूण मुलाला परत करतो व वचन देतो कि उद्या नाही पण प्रत्येक रविवारी मी तुझ्यासाठी एकच काय दोन तास वेळ काढीन.

मित्रांनो ही गोष्ट जरी कल्पीत असली तरी आपल्या आयुष्यात घडणारी आहे. मित्रांनो गोष्ट लिहता लिहता माझे ही डोळे भरून आले व वडिलांची प्रकर्षाने आठवण आली. मला माझ्या वडिलांचा सहवास फारच थोडी वर्षे मिळाला. पण त्यांनी जो वेळ बालपणी माझ्यासाठी दिला होता त्याचे ऋण मी जन्मभर विसरणार नाही.

आज यंत्रयुगात काम करताना माणसाचे एक जीवंत यंत्र झाले आहे. आज ही समस्या श्रीमंत तसेच गरीब दोन्ही स्तरावर भेडसावत आहे. श्रीमंताला पैशाची भूक आहे. मान सन्मान , पदाशिवाय तो जगू शकत नाही. त्याला लोकांसाठी वेळ आहे पण स्वतःसाठी , कुटुंबासाठी वेळ नाही. तो नुसतीच नोकरी / व्यवसायाच करत नाही तर ती नोकरी / व्यवसायच त्याला वेठबिगार बनविते. गरजा वाढत असतात. पैशाची आवश्यकता वाढते. नितीमूल्यांच्या कल्पना सैल होत जातात. पैसा हाच धर्म होतो. कुटूंबाला सोयी सुखे पुरवली की आपले कर्तव्य संपले असे त्याला वाटते. कुटूंबाला तो ग्राह्य धरायला लागतो. कुटूंबाने वेळेची मागणी करू नये अशी त्याची अपेक्षा असते. तो माणूस मग एकलकोंडा व्हायला लागतो. पार्टी मध्ये हजर असून सुद्धा स्वतःचा शोध घेत राहतो.

गरिब लोकांना पैसाच पुरत नाही आणि मग जास्त पैसा मिळवण्यासाठी जास्त तास काम करण्यापलिकडे त्यांच्याकडे पर्यायच नसतो.

मित्रांनो तुम्ही कधी सर्कस बघितली आहे. एक जोकर एकाच वेळेला ५-६ चेंडू हवेत उडत ठेवतो व आपले कसब दाखवून एकही चेंडू जमीनीवर पडू देत नाही.
आपले आयुष्य म्हणजे अशाच ५ चेंडूचा खेळ आहे. हे ५ चेंडू म्हणजे नोकरी / व्यवसाय , मित्र , कुटूंब , तब्बेत , प्रेरणा. नोकरीचा चेंडू रबराचा आहे तर बाकीचे काचेचे. नोकरी / व्यवसाय दुसरा मिळू शकेल पण इतर चार काचेच्या चेंडूना ओरखडा आला तर काही खरे नाही. आपल्याला हे ५ चेंडू हवेत उडवत ठेवून जगता आले पाहिजे. तसा प्रयत्न तर करणे भागच आहे.

शेवटी यश सर्व आघाडयांवर मिळाले तरच त्याची खरी नशा चढू शकते. एका प्रकारातील संपूर्ण यश दुसऱ्या प्रकारातील अपयश झाकू शकत नाही. परंतु हे सर्व जमण्यासाठी लहानपणापासून संस्कार व्हावे लागतात , वाचनाची सवय लावावी लागते. निरीक्षण करावे लागते. काय मिळवताना काय गमवावे लागेल याच हिशेब मांडता आला पाहिजे. किती मिळवायचे हे गणित सोडवावे लागेल. प्रत्येकालाच दिवसाचे २४ तास मिळतात पण वेळेचा सदुपयोग कसा करायचा हे प्रत्येकाने शोधले पाहिजे. प्रत्येक गोष्टीसाठी वेळ मिळतोच असे नाही तर तो काढावा लागतो.

काय मित्रांनो तुमचा काय अनुभव ? काय करायची का सुरवात ? Better late than never.